# पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांचा जिल्हा दौरा

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०९ऑक्टोंबर :** जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे गृहराज्यमंत्री(ग्रामिण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार डॉ. पंकज भोयर हे दि.१२ ऑक्टोबर २०२५ रोजी भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढील प्रमाणे आहे.

दुपारी १२.०० वाजता शासकीय वाहनाने गोंदिया येथून भंडाराकडे प्रयाण करतील.

तसेच रविवार १२ ऑक्टोबर, २०२५ रोजी दुपारी भंडारा येथे आगमन जिल्हाधिकारी कार्यालय येथे दुपारी दोन वाजता जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. यानंतर सोईनुसार भंडारा येथून शासकीय वाहनाने प्रयाण करतील.

# राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान योजनेअंतर्गत १५ ऑक्टोबरपर्यत सूचना, आक्षेप, हरकती करावेत

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा :** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान योजनेअंतर्गत ५० व्या ग्रंथ भेट योजनेसाठी निवड झालेल्या ग्रंथाची मराठी, हिंदी व इंग्रजी यादी ग्रंथालय संचालनालयाच्या www .dol. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर १५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत खुली ठेवण्यात आली असून या मुदतीत सूचना, हरकती, आक्षेप मागविण्यात आले आहेत. तसेच शासनमान्य ग्रंथाच्या यादीसाठी सन २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या मराठी भाषेतील ग्रंथाची निवड करण्यासाठी ग्रंथ यापुर्वी ग्रंथालय संचालनालयास पाठविले नसल्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, नगर भवन टाऊन हॉल मुंबई-४००००१ या पत्त्यावर १५ ऑक्टोबर २०२५ पर्यत पाठविण्यात यावीत, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी खुमेन्द्र बोपचे यांनी केले आहे.

# चिमुकल्यांनो गावागावात स्वच्छतेचे संदेशवाहक बना

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा :** जिल्ह्यात सुरू असलेल्या 'स्वच्छता ही सेवा २०२५' मोहिमे अंतर्गत काल सोमवारी 'एक दिवस, एक तास, शालेय विद्यार्थ्यांकरिता स्वच्छता विषयक धडे' हा उपक्रम राबविण्यात आला.

मोहाडी तालुक्यातील बोथली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.) श्री माणिक चव्हाण यांनी हजेरी लावून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. वैयक्तिक, घरगुती व गावपातळीवरील स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत त्यांनी चिमुकल्यांना स्वच्छतेचे संदेशवाहक बनण्याचे आवाहन केले. स्वच्छता ही सेवा २०२५ मोहिमेचा एक भाग म्हणून जिल्ह्यात २ ऑक्टोबर पर्यंत विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याअंतर्गत काल सोमवारी जिल्हाभरातील शाळांमध्ये एक दिवस एक तास विद्यार्थ्याकरीता स्वच्छता विषयक धडे हा उपक्रम राबविण्यात आला. मोहाडी पंचायत समिती मधील बोथली जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री माणिक चव्हाण यांनी भेट देऊन विद्यार्थ्यासोबत थेट संवाद साधला. या प्रसंगी जिल्हा कक्षाचे अजय गजापुरे, राजेश येरणे, सरपंच योगेश वैद्य, उपसरपंच संदीप इंगळे, ग्रामपंचायत अधिकारी शारदा गिरीपुंजे, शिक्षिका सौ. दीपा गोबाडे, शिक्षिका सीमा नागपुरे यांसह ग्राम पंचायत कर्मचारी उपस्थित होते. सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यासोबत संवाद साधताना उप मुख्य अधिकारी श्री माणिक चव्हाण यांनी, घर, शाळा व गाव या तिन्ही स्तरांवर स्वच्छतेची गरज स्पष्ट केली. 'स्वच्छतेची सवय केवळ वैयक्तिक पातळीवरच नाही, तर ती घराघरांत आणि संपूर्ण गावात रुजविण्याचे काम विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे संदेशवाहक बनून करावे असे आवाहन केले. त्यांनी, विद्यार्थ्यांना घरगुती पातळीवर ते कोणत्या स्वच्छतेच्या सवयी पाळतात याची विचारपूस केली. चिमुकल्यांनी उत्साहाने उत्तरे देत स्वच्छतेविषयीची आपली जबाबदारी व्यक्त केली. यावेळी स्वच्छतेच्या सवयी शाळे पासून घरापर्यंत पोहोचवून गावोगावी स्वच्छतेचा संदेश नेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

# निवडणुकीच्या तारखेची वाट पाहत, एकूण ११ महिला उमेदवार होतील; आरक्षणानंतर राजकीय हालचाली तीव्र

## सार्वत्रिक निवडणूक- २०२५ प्रारुप आरक्षण सोडत

**साकोली दि.०९ऑक्टोंबर :** नगर परिषद सदस्यांसाठी आरक्षण जाहीर झाल्यानंतर, संभाव्य उमेदवारांकडून राजकीय हालचाली तीव्र झाल्या आहेत, आता निवडणुकीच्या तारखेची वाट पाहिली जात आहे. साकोली/सेंदुरवाफा नगर परिषदेच्या एकूण १० प्रभागांसाठी २० नगरसेवकांपैकी १० पुरुष आणि १० महिला आहेत आणि नगराध्यक्षा - एक सर्वसाधारण महिला असल्याने एकूण ११ महिला नगर परिषदेवर निवडून येतील. नगर परिषद नगरसेवकांचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर, प्रत्येक गल्ली, परिसर आणि पानटपरीमध्ये एकच चर्चा आहे की कोण कोणत्या प्रभागातून निवडणूक लढवणार? नगर परिषद सभागृहात उपविभागीय अधिकारी आणि नगर परिषद मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीत जाहीर झालेल्या नगर परिषद सदस्यांच्या आरक्षणात सर्व राजकीय पक्षांचे अधिकारी उपस्थित होते. १० प्रभागांसाठी जाहीर



केलेल्या आरक्षणांमध्ये २० जागांपैकी १० जागांवर महिलांचा समावेश असेल. जाहीर केलेल्या आरक्षणानुसार, प्रभाग क्रमांक १ हा नाममात्र महिला/सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक २ हा नाममात्र महिला/सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ३ अनुसूचित जाती/सर्वसाधारण महिलांसाठी आणि प्रभाग क्रमांक ४ हा नाममात्र/सर्वसाधारण महिलांसाठी आहे. क्र.५- अ. जाति महिला / सर्वसामान्य, प्रभाग क्र.६-अनु. जाति / सर्वसामान्य महिला, प्रभाग क्र. ७- अ. जाति महिला / नि नामाप्र, प्रभाग क्र.८-अ. जाति महिला / मे सर्वसाधारण, प्रभाग क्र.९- नामाप्र महिला/सर्वसामान्य, प्रभाग क्र.१०- अ. जमाति महिला/सर्वसामान्य यांच्या समावेश राहील.

# एम बी पटेल महाविद्यालयात बॉटनिकल सोसायटीची स्थापना

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.०९ऑक्टोंबर :** बोटॅनिकल सोसायटीच्या उद्घाटन समारंभात दुर्मिळ वनस्पतींच्या वैज्ञानिक पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे, साकोली येथील मनोहर भाई पटेल महाविद्यालयात बोटॅनिकल सोसायटीची स्थापना करण्यात आली. नागपूर विद्यापीठातील वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. नितीन डोंगरवार हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी ऑर्किड आणि त्यांच्या परागीकरणावर व्याख्यान दिले, ज्यामध्ये या दुर्मिळ आणि सुंदर वनस्पती प्रजातीच्या वैज्ञानिक पैलूंवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी.जे. खुणे यांनी भूषवले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना वनस्पतिशास्त्रातील विविध संधींबद्दल माहिती दिली आणि त्यांना या क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांनी या विषयातील त्यांची सखोल आवड देखील सांगितली.

पानांच्या कला प्रदर्शन कार्यक्रमाचे समन्वयक



डॉ. खुशाल बोरकर यांनी त्यांच्या प्रास्ताविकात सांगितले की, बोटॅनिकल सोसायटी

संस्थेचा उद्देश आणि महत्त्व अधोरेखित करण्यात आले. वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अमित जगिया आणि विद्यार्थी प्रतिनिधी भीमसेन पुस्तोडे हे देखील व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी बोटॅनिकल सोसायटीच्या नवीन पदाधिकाऱ्यांची घोषणाही करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन मानसी द्रिगकर आणि गौरव बोरकर यांनी केले, तर डिंपल चांदेवार यांनी पाहुण्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनी पानांपासून आणि फुलांपासून बनवलेल्या हार घालल्या.

तयार केलेल्या कलाकृतींचे प्रदर्शन, 'लाइफ आर्ट एक्झिबिशन' देखील आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे परीक्षण प्रा. प्राची एन. रणदिवे आणि प्रगती कात्रे यांनी केले. स्पर्धेत ऋषिका राऊत यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर धनंजय राऊत आणि योगेश्वर भारद्वाज यांनी दुसरे स्थान पटकावले. या कार्यक्रमाच्या यशात डॉ. संजय मेश्राम, प्रा. राजीव मेश्राम आणि इतर सहकाऱ्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# परमात्मा एक सेवकांची कोजागिरी व सत्कार कार्यक्रम संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.०९ऑक्टोंबर :** परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ नागपूर अंतर्गत, चर्चासत्र स्थळ, मानव मंदिर, एकोडी रोड, साकोली येथे, कोजागिरी उत्सव व सेवकांचे गौरव कार्यक्रम संपन्न झाले. या कार्यक्रमा प्रसंगी अध्यक्षस्थानी परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ नागपूर मंडळाचे उपाध्यक्ष व साकोली परिसरातील मार्गदर्शक श्री. देवराम तुमसरे साहेब होते. विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ मार्गदर्शक रामलाल रुखमोडे, माणिकराव निखारे, डॉ.अजयराव तुमसरे, वासुदेव वाडीभस्मे, उत्तम वाडीभस्मे, प्रमुख पाहुणे होते. चर्चासत्र स्थळाचे अध्यक्ष सुरेश वलथरे, व सचिव बाबुराव मेश्राम, आनंद सोनवाने, श्रीराम निंबेकर, धनंजय तुमसरे, रायभान सोनवाने, सेवकराम बावनकर, रामदास मस्के, चंद्रकांत सोनवाने, शेषराव भानारकर, दिगंबर दिघोरे, राजकुमार





कांबळे, यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान बाबा हनुमानजी, व मानवधर्माचे संस्थापक महानत्यागी बाबा जुमदेवजी आणि मातोश्री वाराणसीआई यांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. यानंतर बाबांच्या शिकवणीवर चर्चा बैठक कार्यक्रम घेण्यात आले. नोकरीवर रुजू झालेले, गुणवंत विद्यार्थी सेवकांच्या गुणगौरव प्राविण्यप्राप्त यांना मानचिन्ह ट्रॉफी व पदक देऊन विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते वितरित पारितोषिक देऊन शाल श्रीफळने यांचे सत्कार करून स्वागत करण्यात आले. यावेळी, सेवक, सेविका, बालगोपालांचे नृत्य, दांडिया, सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात आले.

भव्य भोजनाचा आस्वाद घेतला व अमृततुल्य दुध सर्वांना वाटप करण्यात आले होते. कोजागिरी कार्यक्रमासाठी परमात्मा एक सेवक चर्चासत्र स्थळ, देखरेख समितीचे सर्व पदाधिकारी, नवयुवक सर्व सेवक परिवार सर्वांनी मोलाचे श्रेय व सहकार्य केले.

या कार्यक्रमाला साकोली परिसरातील बहुसंख्येने सेवक, सेविका, बालगोपाल उपस्थित होते.

# सरस्वती शाळेत अभिजात मराठी भाषा सप्ताह संपन्न



**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी दि.०९ऑक्टोंबर :** सरस्वती कनिष्ठ महाविद्यालय मोहाडी येथे अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेर होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.सुषमा राघोर्ते या होत्या.प्रमुख वक्ते म्हणून एन.जे.पटेल महाविद्यालय मोहाडीचे मराठी विभाग प्रमुख प्रा.नरेश आंबिलकर उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून मराठी साहित्यात भंडारा जिल्ह्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून झाडीबोलीतील शब्दसंपत्ती किती वैविध्यपूर्ण आहे हे विविध उदाहरणातून उलगडून दाखविले. अध्यक्षीय भाषणातून प्रा.राघोर्ते यांनी भाषा वाचली तरच संस्कृती टिकेल यासाठी सर्वांनी मराठी भाषेच्या संवर्धनामध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.नरेंद्र गायधने यांनी केले. आभार प्रा.नरेट्टी यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. निमकर ,प्रा. चांदेवार,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अथक परिश्रम घेतले.

# अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाचा शुभारंभ संपन्न

## विश्वकर्मा लाभार्थी निशा चोपकर यांच्या हस्ते उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०९ऑक्टोंबर :** शासकीय आद्योगिक प्रशिक्षण संस्था भंडारा, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) भंडारा आणि शासकीय तांत्रिक विद्यालय भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योग- संरेखित आणि नवयुगीन अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाचा शुभारंभ आज संपन्न झाला. या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाचे उद्घाटन विश्वकर्मा लाभार्थी निशा चोपकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या जयश्री निंबार्ते यांनी केले. या वेळी आयटीआय परिसरात मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. या उपक्रमाचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आला. तसेच या कार्यक्रमाला आभासी पद्धतीने राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमांतर्गत विविध उद्योगांशी संलग्न अल्पकालीन व्यवसाय प्रशिक्षण सुरू करण्यात आले असून त्याद्वारे विद्यार्थ्यांना कौशल्याधारित रोजगारक्षम बनविण्याचा हेतू आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भंडारा येथे फोर व्हीलर सर्विस असिस्टंट, असिस्टंट इलेक्ट्रिशन, असिस्टंट कारपेंटर (वुडन फर्निचर), डिजिटल मित्र, प्लंबर जनरल, मॅन्युअल मेटलींग वेल्डिंग, CNC टर्निंग ऑपरेटर आणि इलेक्ट्रिशन डोमेस्टिक





सोल्युशन हे प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू झाले आहेत.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) भंडारा येथे थ्रीव्हीलाईट रिपेअर टेक्निशियन, डिजिटल मित्र, हॅन्ड एम्ब्रॉयडरी, प्रोफेशनल मेकअप आर्टिस्ट, बॅक ऑफिस असोसिएट (फायनान्शियल सर्विसेस), क्राफ्ट बेकर, असिस्टंट इलेक्ट्रिशन, सेल्फ एम्प्लॉइड टेलर, वेब डेव्हलपर आणि इलेक्ट्रिशन डोमेस्टिक सोल्युशन हे अभ्यासक्रम सुरू झाले.

तर शासकीय तांत्रिक विद्यालय भंडारा येथे ऑटोमोटिव्ह वेल्डिंग मशीन असिस्टंट आणि इलेक्ट्रिशन डोमेस्टिक सोल्युशन हे कौशल्यवर्धक प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत सुधाकर झळके (सहायक कौशल्य विकास आयुक्त), जिल्हा माहिती अधिकारी शैलजा वाघ, व्यवसाय शिक्षण अधिकारी व्ही. एम. लाकडे उपस्थित होते. जिल्हा तसेच जिल्हाबाहेरील युवकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक संस्थेने केले.

# पिटेझरी सागवनच्या कत्तल प्रकरणात आर एफ ओ कडून डी एफ ओ कार्यालयाची दिशाभूल

## वाइल्ड लाइफ पिटेझरीतील सागवानाची अवैध वृक्षतोड प्रकरण



**महासागर प्रतिनिधी**

**किन्ही मोखे दि.९ऑक्टोंबर :** नागझिरा वन्यजीव विभागाच्या पिटेझरी एरियातील सुमारे ५० सागवानाची अवैध वृक्षतोड प्रकरण समोर आले आहे. याची तक्रार नागझिरा वाइल्ड लाइफ चे उपसंचालक कार्यालय साकोलीत करण्यात आली.

या संदर्भात पिटेझरीचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या कडून साकोली च्या डी एफ ओ कार्यालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अवैध वृक्षतोड वाइल्ड लाइफ पिटेझरी मध्ये नव्हे , तर प्रादेशिक मध्ये झाल्याचा दावा पिटेझरीचे आर एफ ओ यांच्या कडून करण्यात येत आहे.

पिटेझरीतील बॅरल गेट , फरसनाला परिसर, सोनारगाडी, मामाभाषा परिसर , दमाही, मोठा नाला परिसर येथील सुमारे ५० च्या वर सागवान लाकूड कापण्यात आले आहेत.

याची पुराव्यानिशी तक्रार साकोली तील नागझिरा वाइल्ड लाइफ च्या उपसंचालक कार्यालयात करण्यात आली. त्यानंतर वाइल्ड लाइफ च्या उपसंचालक कार्यालयातून पिटेझरीचे वनपरिक्षेत्र अधिकारी सागर बारसागडे यांना विचारणा करण्यात आली . परंतु , ती सागवान कत्तल (वृक्षतोड) वाइल्ड लाइफ मधील नव्हे तर वनविभागाच्या प्रादेशिक एरिया मधील असल्याचा दावा आर एफ ओ बारसागडे यांनी साकोली येथील उपसंचालक कार्यालयात केला.

त्यावरून बारसागडे हे साकोलीतील उपसंचालक कार्यालयातील वरिष्ठांची दिशाभूल करून प्रकरण अंगलट येताच कातडी वाचविण्याचा केविलवाणा प्रयत्न करतांना दिसून येत आहेत.

**आता या प्रकरणाची चौकशी आवश्यक**

**वरिष्ठ अधिकारी करणार चौकशी**

पिटेझरी सागवन अवैध कत्तल प्रकरणी गोंदियातील नवेगाव नागझिरा वन्यजीव व्याघ्र प्रकल्पाच्या जगताप म्हणाल्या , या वृक्षतोडीची तक्रार प्राप्त झाली आहे .

या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल . तत्पूर्वी , साकोलीतील नागझिरा वाइल्ड लाइफ चे उपसंचालक प्रितमसिंग कोडापे यांना व्हाट्सअप वरून तक्रारी वर प्रतिक्रिया मागण्यासाठी माहिती पाडण्यात आली . त्यांनी कोणत्याही प्रकारचे प्रतिसाद दिला नाही.

दोनदा कार्यालयात भेट दिली ते उपस्थित नव्हते. शिवाय दोन वेळा भ्रमणध्वनी वरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला . त्यांनी कोणतेही प्रतिसाद दिला नाही. यावरून असे समजते की वरिष्ठांशी टाळाटाळ व दिशाभूल सुरू आहे. परंतु वरिष्ठ अधिकारी चौकशी च्या कामाला लागले आहेत.

# लाखांदूर तालुक्यात 'सेवा पंधरवडा' यशस्वी: उद्दिष्टपूर्ती!

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूरदि.९ऑक्टोंबर :** महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेला 'सेवा पंधरवडा' कार्यक्रम लाखांदूर तालुक्यात मा. श्री. वैभव पवार, तहसीलदार लाखांदूर यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे.

भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या जन्मदिनापासून (१७ सप्टेंबर २०२५) ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर २०२५) 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत हा पंधरवडा राबविण्यात आला.

जिल्हाधिकारी भंडारा मा. श्री. सावन कुमार, अपर जिल्हाधिकारी मा. श्री. राजेंद्रकुमार जाधव, आणि उपविभागीय अधिकारी साकोली मा. श्रीमती स्वाती देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार वैभव पवार यांनी प्रभावी नियोजन करत शासनाने दिलेले सर्व उद्दिष्ट वेळेत पूर्ण केले. लाखांदूर तालुका हा जिल्ह्यात सर्वप्रथम सर्व उद्दिष्टे पूर्ण करणारा तालुका ठरला आहे.

**सेवा पंधरवड्यात राबविण्यात आलेले प्रमुख कार्यक्रम:**

**१. पांदण रस्ते मोहीम:**

पहिल्या टप्प्यात ८९ गावांत शिवार फेरी आयोजित करण्यात आली. यामध्ये ८९३ पांदण रस्त्यांचा शोध घेऊन ६२



ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा घेऊन त्यांना मंजुरी देण्यात आली.

आता जिल्हाधिकारी यांच्या मंजुरीनंतर गाव नमुना १फ तयार करण्याची कार्यवाही सुरू होईल.

**२.अतिक्रमित घरे नियमाकुल:**

'सर्वांसाठी घरे' या उपक्रमाअंतर्गत २०११ पूर्वीची ३२ अतिक्रमित घरे नियमानुकूल करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली.

**३. नाविन्यपूर्ण उपक्रम: 'लक्ष्मी मुक्ती' योजना:**

तहसीलदार वैभव पवार यांच्या विशेष नियोजनामुळे लक्ष्मी मुक्ती योजनेचे १००८ उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले. यासाठी ग्राम महसूल अधिकारी यांनी कार्यालयीन वेळेत तसेच सुट्टीच्या दिवशीही अक्षरशः गाव-न-गाव पिंजून काढले. ७/१२ उताऱ्यावरील पुरुष शेतकऱ्यांच्या नावासोबत त्यांच्या पत्नीचे नाव दाखल करण्याचे हे उद्दिष्ट आहे, आणि त्यासंबंधी आदेश काढून कार्यवाही सुरू झाली आहे.

**४. रस्ते अदालत:**

श्री. डी.के. धकाते आणि श्री. अनिल पवार, नायब तहसीलदार, तसेच सर्व मंडळ अधिकारी यांनी १० गावांमध्ये रस्ते अदालत घेऊन पांदण रस्त्यांसंदर्भातील वाद सोडवले.

यामुळे १२ रस्त्यांवरील वाद मिटवून रस्ते मोकळे करण्यात आले.

सर्व उद्दिष्टे वेळेत पूर्ण केल्याबद्दल तहसीलदार वैभव पवार यांनी श्री. डी.के. धकाते आणि श्री. अनिल पवार, नायब तहसीलदार, श्री. आर. एस. गेडाम, सहा. महसूल अधिकारी, श्री. होमदेव नाकतोडे, श्री. रंगारी, श्री. उपासे, श्री. प्रवीण कौरवार, श्री. पडोळे, श्री. मदनकर, मंडळ अधिकारी, आणि सर्व ग्राम महसूल अधिकारी यांचे अभिनंदन करून आभार मानले.

## विदर्भाच्या विकासाला मिळणार नवी गती; रेल्वे संपर्क अधिक सशक्त होणार - माजी खा. सुनील मेंढे

**भुसावळ–वर्धा तिसरी व चौथी लाईन आणि गोंदिया–डोंगरगढ नवीन रेल्वे मार्गाला केंद्राची मंजुरी.**

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०९ऑक्टोंबर :** विदर्भ प्रदेशासाठी केंद्र सरकारकडून दोन मोठे रेल्वे प्रकल्प मंजूर झाले आहेत. भुसावळ–वर्धा दरम्यान तिसरी आणि चौथी रेल्वे लाईन उभारणी तसेच गोंदिया–डोंगरगढ नवीन रेल्वे मार्ग या दोन्ही प्रस्तावांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे विदर्भ आणि आसपासच्या प्रदेशातील रेल्वे संपर्क, मालवाहतूक आणि औद्योगिक विकासाला नवे बळ मिळणार आहे. भुसावळ–वर्धा मार्ग हा मुंबई–हावरा उच्च घनतेच्या रेल्वे कॉरिडॉरचा एक महत्त्वाचा भाग आहे. सध्या या मार्गावर दोन लाईन असून त्यावर प्रवासी व मालगाड्यांचा ताण मोठ्या प्रमाणात आहे. या ताणावर मात करण्यासाठी तिसरी आणि चौथी लाईन उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पाची लांबी सुमारे ३१४ किलोमीटर असून, यावर ९,१९७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. कामाची पूर्तता पुढील पाच वर्षांत करण्यात येणार आहे. दरम्यान, गोंदिया–डोंगरगढ नवीन रेल्वे मार्ग हा महाराष्ट्र–छत्तीसगड राज्यांमधील संपर्क अधिक मजबूत करणारा प्रकल्प ठरणार आहे. या मार्गाद्वारे विदर्भातून पूर्व भारताकडे जाणाऱ्या रेल्वे वाहतुकीस थेट आणि जलद जोडणी मिळणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे औद्योगिक क्षेत्र, व्यापार, पर्यटन आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असे रेल्वे मंत्रालयाने नमूद केले आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे रेल्वे वाहतूक क्षमता मोठ्या प्रमाणात वाढेल, प्रवासी गाड्यांची वेळेतील नियमितता सुधारेल आणि पर्यावरणपूरक वाहतूक प्रणालीस प्रोत्साहन मिळेल. अंदाजानुसार, या प्रकल्पांमुळे दरवर्षी ९ कोटी लिटर डिझेलची बचत आणि ४५ कोटी किलो कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनात घट होईल.

यावर सुनिल मेंढे म्हणाले की, 'भुसावळ–वर्धा मार्ग हा मध्य भारताचा कणा आहे. या मार्गावर तिसरी व चौथी लाईन मंजूर झाल्याने नागपूर, भंडारा, गोंदिया या विभागांतील रेल्वे वाहतुकीतील ताण कमी होईल. प्रवाशांना सुलभ, वेळेवर आणि जलद सेवा मिळेल तसेच मालवाहतुकीला मोठा हातभार लागेल.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, पालकमंत्री पंकज भोयर यांनी विदर्भाच्या विकासाची नाळ ओळखून हा निर्णय घेतला, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.'

# नवीन शैक्षणिक धोरणावर राष्ट्रीय चर्चासत्र व अधिवेशन




**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०९ऑक्टोंबर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर टिचर्स ऑर्गनायझेशन द्वारा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर चर्चासत्र व जिल्हा अधिवेशनाचे आयोजन इंद्रलोक सभागृह भंडारा येथे करण्यात आले होते.

या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन माऊली महाविद्यालय नागपुरचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर खडसे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रातुम नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य व संघटनेचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश चिमणकर, सिनेट सदस्य डॉ. श्रीकांत भोवते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर टिचर्स ऑर्गनायझेशनचे जिल्हा अध्यक्ष डॉ. राहुल भगत, सचिव डॉ. रत्नपाल डोहने उपस्थित होते. यावेळी शोधनिबंध पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये डॉ. मनीष वानखेडे, डॉ. संतोष सुरडकर, प्रा. बुद्धघोष लोहकरे, डॉ. प्रमोदकुमार बागडे यांनी 'भारतीय ज्ञान प्रणाली व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील अभिजनवादी अजेंडा' या विषयावर आपली मते मांडली.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार प्राध्यापकांचा वाढलेला कार्यभार समस्या आणि समाधान' या विषयावर डॉ. राहुल भगत, डॉ. प्रदीप मेश्राम, डॉ. विनोद राऊत, डॉ. सुरेश खोब्रागडे लाखनी यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. या अधिवेशनात बहुजनांच्या हिताचे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आहे की नाही यावर साधक बाधक चर्चा झाली.

अधिवेशनाच्या समारोपाच्या अध्यक्षस्थानी डॉ. राहुल भगत होते. याप्रसंगी डॉ. विकास जांभुळकर, डॉ. शैलेंद्र लेंडे, डॉ. छत्रपाल लांबकाने यांच्या उपस्थितीत संघटना बांधणी व पुढील दिशा व प्राध्यापकांपुढील आव्हाने व समस्या यावर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी पीएच .डी प्राप्त २७ प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला.

या चर्चासत्राला यशस्वी करण्यासाठी प्रा. सुभाष गोंडाने, डॉ. मंगेश वागदे, डॉ. ममता राऊत, डॉ. विकास मेश्राम, डॉ. महेश भैसारे, डॉ. प्रमोद वरखडे, डॉ. चंद्रमणी भाऊते, डॉ. लालचंद्र रामटेके, प्रा. गायत्री शिरसाम, डॉ. कृष्णा पासवान, डॉ. रेणुकादास उबाळे प्रा, अनिता बनसोड, प्रा. अमिता पाटील, प्रा. राहुल भोरे, डॉ. श्वेता वेगड, डॉ. जगजीवन कोटांगले, डॉ. रक्षित बागडे, डॉ. थूल, डॉ. प्रशांत जांभुळकर यांनी अथक परिश्रम घेतले.

# दावा न केलेल्या ठेवी परत मिळवा जिल्ह्यातील १५०,४१२ खातेदारांना आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०९ऑक्टोंबर :** भंडारा जिल्ह्यातील विविध बँकांमधील वैयक्तिक, संस्थात्मक आणि सरकारी योजनांच्या खात्यांमध्ये सुमारे ३२ कोटी रुपयांच्या दावा न केलेल्या ठेवी शिल्लक आहेत. या ठेवींचा एकूण १५०,४१२ खातेदारांना परतावा मिळवून देण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे.

ही मोहीम १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत जिल्हा अग्रणी बँक – बँक ऑफ इंडिया यांच्या पुढाकाराने आणि सर्व सदस्य बँकांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राजू नंदनवार यांनी दिली.

. नंदनवार यांनी सांगितले की, देशभरात सुमारे १ लाख ३५ हजार कोटी रुपयांच्या दावा न केलेल्या ठेवी विविध बँकांमध्ये शिल्लक आहेत.

त्यापैकी महाराष्ट्र राज्यात ५८६६ कोटी रुपये, ज्यात वैयक्तिक खात्यांच्या ४६१२ कोटी, संस्थांच्या १०८२ कोटी, आणि सरकारी योजनांतील १७२ कोटी रुपयांच्या ठेवी समाविष्ट आहेत.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमानुसार, १० वर्षांपासून निष्क्रिय असलेल्या खात्यांतील ठेवी 'ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता निधी (Depositor Education and Awareness Fund DEAF)' मध्ये हस्तांतरित केल्या जातात. तथापि, खातेदारांना आपले पैसे परत मिळवण्याचा पूर्ण हक्क आहे.

ठेवी परत मिळविण्यासाठी संबंधित खातेदारांनी आपल्या बँकेत संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे व अद्ययावत ख्ण्ण सादर करणे आवश्यक आहे.

या मोहिमेद्वारे सर्व बँकांकडून जनजागृती शिबिरे व ग्राहक भेटी आयोजित केल्या जाणार असून, खातेदारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी व्यवस्थापक राजू नंदनवार यांनी केले आहे

## आगामी निवडणुकीसाठी संघटनात्मक बांधणी, विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा

### मा. नाना पटोले यांच्या उपस्थितीत बैठक



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.०९ऑक्टोंबर :** आगामी साकोली नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने साकोली येथील मा. आमदार नाना पटोले यांच्या जनसंपर्क कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीत निवडणुकीसाठीची रणनिती, तसेच संघटनात्मक बांधणी यांसह विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली.

बैठकीला भंडारा गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे, भंडारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. मोहनभाऊ पंचभाई साकोली विधानसभा प्रभारी श्री. राजा तिडके, भंडारा जिल्हा किसान काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. अजय तुमसरे, सभापती श्रीमती शीतलताई राऊत, साकोली तालुका काँग्रेस अध्यक्ष डॉ. अशोक कापगते, शहराध्यक्ष श्री. दिलीप मासुरकर, श्रीमती पुष्पाताई कापगते, मा.जिल्हा परिषद सदस्य श्री. मदन रामटेके, साकोली तालुका महिला काँग्रेस अध्यक्षा श्रीमती छायाताई पटले, शहराध्यक्ष श्री. अश्विन नशीने यांच्यासह साकोली शहर काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भंडारा शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या बैठकीत नगर परीषद, भंडाराच्या निवडणुकी संदर्भात चर्चा

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०९ऑक्टोंबर :** आज दिनांक ०९/१०/२०२५ ला भंडारा शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकारिणीची बैठक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय सचिव तथा माजी आमदार श्री. राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष, श्री. नाना पंचबुध्दे, प्रदेश महासचिव श्री. धनंजय दलाल, जिल्हा बँकेचे अध्यक्ष श्री. सुनिल फुंडे, व महिला जिल्हाध्यक्ष श्रीमती सरिताताई मदनकर यांच्या मार्गदर्शनात व प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. याप्रसंगी आगामी नगर परीषद भंडाराच्या निवडणुकी संदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नगराध्यक्ष पदाचे तिकीट वाटण्याचे सर्व अधिकारी श्री. प्रफुल पटेल यांना देण्यात आले असून भंडारा नगर परीषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा नगराध्यक्ष निवडूण यावा याकरीता पक्षातील सर्वांनी पाठीशी राहून प्रयत्न करावयाचे आहे. असा ठराव घेण्यात आला व त्याकरीता निवडणुकीच्या कामाला लागण्याची सुचना श्री. राजेंद्र जैन यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करतांना दिली. पक्ष संगठन मजबुत करण्याकरीता प्रत्येक वार्डात सभा घेण्यात याव्या आणि यामध्ये जास्तीत जास्त संख्येत तरुण युवक, युवती वर्गाचा मोठया प्रमाणात सहभाग वाढविण्यात यावा असे बैठकीत ठरविण्यात आले. याप्रसंगी प्रमुख उपस्थितांमध्ये महेंद्र गडकरी, अॅड. विनयमोहन पशिने, परवेज पटेल, योगेश हेडाऊ, नरेंद्र झंझाड, हेमंत महाकाळकर, डॉ. रविंद्र वानखेडे, शेखर (बाळाभाऊ) गभने, नारायणसिंह राजपुत, राहुल निर्वाण, अॅड. नेहा शेंडे, राजु पटेल, सुनिल साखरकर, विक्रम उजवणे, लोकेश खोब्रागडे, जवाहर निर्वाण, बल्ली भाई, विजय खेडीकर, मनिष वासनिक, प्रदिप सुखदेवे, संजय सतदेवे, उमेश ठाकरे, राजू सतदेवे, अरुण भेदे, मंजुषा बुरडे, भोजराज वाघमारे, महेंद्र वाहाणे, राहुल निर्वाण, रूपेश टांगले, अशोक सांडेकर, सुमित शामकुंवर, सुरेश थोटे, किरण हेडावु, राजेंद्र आनंद प्रशांत देशकर, नितीन शेबरे, अमन मेश्राम, खुशाल निपाने, राजेश्री राखडे, इंदू येरकडे, धनवंता बोरकर, किर्ती कुंभरे, रफीका शेख, अ. कलाम शेख, रिजवान खान, मेहमुद खान, लियाकत खान, गणेश चौधरी, रामेश्वर पराते, संजय वरगंटीवार, ओमप्रकाश चव्हाण, अजय निखार, लोकेश नगरे, तौसिफ तहिर, फरहान पटेल, शाहरुख ताहीर शेख, बाबुराव पुडके, संतोष राजगिरे, मुन्ना ठाकुर, उत्कर्ष राखडे, मोहित सार्वे, सुनिता आगलावे, वंदना तुरस्कर, अफसाना बेगम, दिक्षा निपाने, शुभा पडोळे, रवि लक्षणे, अंबादास मंदुरकर, अक्षय भोतमांगे, सोहेल अहमद, सुषमा माटे, रेणुका धकाते, गीता मेश्राम, राहुल वाघमारे, रिजाज पठाण, फैज खान दतू नागमोते, धनंजय ढगे, दिपक मेश्राम, मोहित पाटेकर, पियुष न्यायकरे, सिमरनभारती गणविर, सुनिल भांडारकर, गीता मेश्राम, रुचिता आग्रे, सुनिल मोगरे, पंकज लिमजे, देवराव गिन्हेपुंजे, रमेश कुंभलकर, प्रकाश येरकडे, राजु साठवणे, सुषमा साखरकर, भारत लांजेवार, शैलेन्द्र पशिने, बबन मेश्राम, विद्या साखरे, प्रकाश मानापुरे, लता मेश्राम, संगिता चव्हाण, गणेश बाणेवार, संजय वरगंटीवार, व फार मोठया संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते




# कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर




**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी दि.०९ऑक्टोंबर :** तालुका विधी सेवा समिती साकोली तथा साकोली व भंडारा जिल्हा सेवानिवृत्त संस्था शाखा साकोली यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर साकोली येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्या. व्ही. एम. गायकवाड अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती साकोली हे होते. या प्रसंगी व्यासपीठावर प्रामुख्याने पी. आर. गोमासे अध्यक्ष भंडारा जिल्हा सेवानिवृत्त कर्मचारी संघटना शाखा भंडारा, तालुका वकील संघाचे अध्यक्ष अॅड. बी.एन. संग्रामे, सचिव अॅड. अमित हालमारे, सरकारी अभियोक्ता तौसीफ खान इत्यादी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष व्ही. एन. गायकवाड न्यायाधीश यांनी जेष्ठ नागरिकांचे हक्क व अधिकार व इतर महत्त्वाच्या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. तर प्रमुख मार्गदर्शक शब्बीर पठाण यांनी जागतिक मानसिक आरोग्य दिवस या विषयावर मार्गदर्शन केले तसेच अॅड. ए. एच. करवडे यांनी आंतरराष्ट्रीय वृद्ध दिवस यावर तर पी. आर. गोमासे यांनी जेष्ठ नागरिकांचे अधिकार याबाबत आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन अॅड. . टी. जे. गिरेपुंजे, प्रास्ताविक शब्बीर पठाण तर आभार प्रदर्शन अॅड. कु. ए. एच. शेंडे यांनी केले. या प्रसंगी अधिवक्तागन, न्यायालयीन कर्मचारी, अधिकार मित्र एल. ए. मल्लानी, श्रीमती बबीता वासनिक व पक्षकार वर्ग उपस्थित होते.

## जिल्ह्यातील ७ तालुक्यामध्ये स्वामित्व योजनेअंतर्गत ५८ सनद वाटप

**भंडारा, दि.०९:** जिल्ह्यातील भूमि अभिलेख विभागात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातंर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती ०२ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीमध्ये ' सेवा पंधरवाडा 'निमित्त भंडारा जिल्ह्यातील तालुका स्तरावर पांदण रस्ते मोजणी, सर्वांसाठी घरे, अतिक्रमण पट्टे, 'नावीण्यपूर्ण उपक्रम 'राबवून विविध उपक्रम आयोजित करून त्यामध्ये एकूण ८ गावामध्ये फेरफार लोक अदालत चे आयोजन करून फेरफार प्रकरणे निकाली करून जनतेला फेरफार प्रकरणे कार्यालयात प्राप्त करून घेणेबाबत सुचना देण्यात आले. जिल्ह्यातील ७ तालुक्यामध्ये स्वामित्व योजनेअंतर्गत एकूण ५८ सनद वाटप शिबीर आयोजीत करून एकूण ९४६ सनद वाटप करण्यात आले आहे.

मोजणी 'क' प्रत २९३ निर्गमित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील एकूण ११०७ पांदन रस्ते पैकी एकूण ३१३ पादंण रस्ते मोजणी करण्यात आली आहे. 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमाअंतर्गत तालुका भंडारा, तुमसर, साकोली तालुक्यातील एकूण ८१३ अतिक्रमण धारकांचे मिळकतीचे मोजणी करून पट्टे वाटप करणेची कार्यवाही करणे सुरू आहे.

इकडील भूमि अभिलेख विभागाकडील देण्यात येणारे योजनेचा लाभ जनतेने घेण्यात यावा असे आवाहन इकडील कार्यालयामार्फत करणेत येत आहे. असे जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख भंडारा विभागानी कळविले आहे.

## धम्मचक्र परिवर्तन दिनी बाबासाहेबांच्या मूर्तीला माल्यार्पण!

### सामाजिक कार्यकर्ते अभिमान उर्फ छोटू भाऊ चौधरी यांचा पुढाकार



**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर दि.०९ऑक्टोंबर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतलेला ऐतिहासिक दिवस म्हणजे धम्मचक्र प्रवर्तन दिन. या पवित्र दिनाचे औचित्य साधून, आज चिचाळ पाईंट बारव्हा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास सामाजिक कार्यकर्ते अभिमान उर्फ छोटू भाऊ चौधरी यांच्या पुढाकाराने व प्रमुख उपस्थितीत माल्यार्पण करण्यात आले. छोटू भाऊ चौधरी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह सकाळी ११ वाजता बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी, त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे स्मरण करून, त्यांच्या समता, बंधुता आणि न्याय या विचारांवर चालण्याची प्रतिज्ञा घेतली.

यावेळी बोलताना अभिमान उर्फ छोटू भाऊ चौधरी म्हणाले की, 'धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ एक धार्मिक सोहळा नाही, तर सामाजिक क्रांतीचा आणि आत्मसन्मानाचा दिवस आहे. बाबासाहेबांनी दाखवलेल्या मार्गावर चालून आपण एक सुदृढ व समतावादी समाज निर्माण करू शकतो.'

या माल्यार्पण सोहळ्यासाठी परिसरातील बौद्ध अनुयायी यांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. याप्रसंगी उपस्थितांनी 'जय भीम' चा जयघोष करत, बाबासाहेबांच्या विचारांना वंदन केले. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये एक सकारात्मक संदेश पोहोचला आणि बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित झाले.

यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यालय चिचाळ येथील मुख्याध्यापक तासलवार सर, विजय मेश्राम लिपीक, राजण मेश्राम सामाजिक कार्यकर्ते, सुरेश मेश्राम सर,, धम्मदिप टेभुर्णे, तं.मु.स.अध्यक्ष रंगारी, सुनील बारसागडे, कमलेश बोरकर सोबत अन्य बौद्ध अनुयायी उपस्थित होते.

### नावात बदल

बौद्ध धर्मांतरण व नामांतरण

**: जुना नाव:**

धर्मशीला सुधीर गजभिये (महार)

मु +पोस्ट : हनुमान वार्ड ठाणा जवाहरनगर तालुका+ जिल्हा भंडारा असे असून

**:सुधारित नवीन नाव:**

धर्मशीला सुधीर बौद्ध

असे रजिस्ट्रेशन नंबर . NPCITY/२३६/२०१५-१७ महाराष्ट्र राज्य राजपत्रानुसार धर्मांतरण व नामांतरण केलेला आहे भविष्यात या नावाने ओळखण्यात यावे.

### नावात बदल

बौद्ध धर्मांतरण व नामांतरण

**: जुना नाव:**

सुधीर येवसुदन गजभिये (महार)

मु +पोस्ट : हनुमान वार्ड ठाणा जवाहरनगर तालुका+ जिल्हा भंडारा असे असून

**:सुधारित नवीन नाव:**

सुधीर येवसुदन बौद्ध

असे रजिस्ट्रेशन नंबर NPCITY/२३६/२०१५ - १७ महाराष्ट्र राज्य राजपत्रानुसार धर्मांतरण व नामांतरण केलेला आहे भविष्यात या नावाने ओळखण्यात यावे.

### कोर्ट विद्यमान श्री. निलेश कदम तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, साकोली यांचे कार्यालय

प्रकरण कमांक- /२०२५
मौजा - सासरा
दिनांक -०७/१०/२०२५

-जाहिरनामा-

निलकंठ हगरू सावरकर

विरुध्द

सचिव तथा निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत कार्यालय, सासरा

ज्याअर्थी अर्जदार निलकंठ हगरू सावरकर रा.सासरा ता. साकोली जि. भंडारा येथील रहिवासी असून अर्जदार यांची बहिण नामे कुसुम हगरू सावरकर हिचा जन्म - सासरा ता. साकोली जि. भंडारा येथे दिनांक ०४/०७/१९७५ ला झालेला असल्याने त्यांनी ग्रा.पं. कार्यालय, सासरा येथे जन्माची नोंद घेण्यासाठी जन्म व मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अंतर्गत कायदेशीर जन्माची नोंद घेऊन प्रमाणपत्र मिळण्याकरिता या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे .आणि ज्याअर्थी उक्त जन्माची नोंद घेऊन प्रमाणपत्र देण्याचे योजिले आहे. त्याकरीता दिनांक १०/११/२०२५ही पेशी तारीख सुनावणीसाठी निश्चीत करण्यात आली असून सुनावणी तहसिल कार्यालय, साकोली येथे सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार आहे. त्याअर्थी याद्वारे जाहीर करण्यात येते की, ज्या कोणाचे कुसुम हगरू सावरकर रा.सासरा हिचा जन्माची नोंद मौजा सासरा येथील ग्रा.पं. सासरा ता. साकोली जि. भंडारा गेथे जन्माची नोंद करण्या संबंधान कुणाची हरकत / आक्षेप सादर करावयाचे असेल तर त्यांनी स्वतः जातीने किवा अभिकर्ता यांचे मार्फत जाहीरनामा प्रकाशित होण्याचे तारखेपासून ०१ महिण्याचे आत सदर न्यायालयात हजर राहून उजर तक्रार /आक्षेप अर्ज सादर करावे. विहीत मुदतीत उजर तक्रार / आक्षेप न कळविल्यास संबंधित वरील कुसुम हगरू सावरकर रा.सासरा ता. साकोली कि, भंडारा यांचे जन्माची नोंद घेऊन तसे प्रमाणपत्र देण्यासाठी संधितांना आदेशित करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिले.

**स्थळ- साकोली** — **तहसिलदार तथा**
**दिनांक-७/१०/२०२५** — **तालुका दंडाधिकारी, साकोली**

### जाहीर नोटीस

### कोर्ट विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, भंडारा.

एम.जे.सी.क. ७१/२०२५ — प्रो.नं.५६८९
पे.ता.१/११/२०२५

अर्जदार : - १) श्रीमती प्रमिला मधुसुदन पडोळे
२) श्री. सुहास मधुसुदन पडोळे दोघेही ए. शास्त्रीनगर, भंडारा.
३) श्रीमती सुषमा पी. मुरे रा. पुणे, तह.जि.पुणे

**---विरूध्द---**

गैरअर्जदार : - निरंक

की, मृतक श्री. मधुसुदन सदाशिवराव पडोळे, रा.शास्त्रीनगर, भंडारा, तह. जि. भंडारा येथील रहिवासी होते ते जे.एम. पटेल कॉलेज भंडारा येथे अध्यापक या पदावरून सेवानिवृत्त झाले होते. मृतक श्री. मधुसुदन पडोळे हे दि. ११/११/२०१८ रोजी अचानक प्रकृती बिघल्याने हृदयविकाराने मरण पावले.

मृतक यांच्या कुटुंबात श्रीमती प्रमिला मधुसुदन पडोळे ही मृतकाची पत्नी असुन श्री. सुहास मधुसुदन पडोळे हा मुलगा आहे व श्रीमती सुषमा पी.भुरे ही मुलगी आहे हे तिघेही मृतकाचे वारसान आहे.

सदर मृतकाच्या मृत्यू पश्चात मृतकाच्या मालमत्तेवर नाव चढविण्याकरीता गेले असता शासकीय कामकाजाकरीता कागदपत्राकरीता वारसान प्रमाणपत्राची मागणी केली. त्याकरीता अर्जदारांनी कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता कोर्टात अर्ज दाखल केलेला असुन सदर प्रकरण दिवाणी न्यायाधीश प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी भंडारा येथे प्रलंबित असुन सदर प्रकरणाची पेशी तारीख **१/११/२०२५** आहे. सबब ज्यांना सदर प्रकरणात काही आक्षेप किंवा उजर घ्यायचे असेल त्यांनी पेशी तारखेवर विद्यमान कोर्टात हजर राहुन आपला उजर दाखल करावा. अन्यथा अर्जदारांतर्फे एकतर्फा आदेश पारीत करण्यात येईल .

करीता आज दि. १/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी ही जाहीर नोटीस प्रकाशित केली आहे.

**भंडारा.** — **आदेशान्वये**
**दिनांक :- १/१०/२०२५** — **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, (वरिष्ठ स्तर)**
**भंडारा.**

RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा

**मालक, मुद्रक, प्रकाशक -** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक-** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

